# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १८ मार्च, २०२५ / फाल्गुन २७, १९४६ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - २१**

---

### भुसावळ (जि.जळगांव) येथील औष्णिक विद्युत केंद्रातील राखेच्या विक्रीमधून होत असलेला गैरव्यवहार

**(१) * ४९७२ श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगांव) येथील औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट नं.४ व ५ मधील राखेच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिकांनी शासनाकडे अनेकवेळा तक्रारी करुनही संबंधितांविरुद्ध कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

औष्णिक विद्युत केंद्रातील राखेची विक्री MOEF & CC तसेच Ministry of Power च्या निकषांनुसार केली जाते.

भुसावळ येथील औष्णिक विद्युत केंद्रातील युनिट नं.४ व ५ मधून फ्लाय ॲश विक्रीमध्ये जानेवारी २०२५ मध्ये अनियमितपणा किंवा अर्थिक घोटाळा होत असल्याचे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पातील राखेच्या विक्रीचे धोरण निश्चित करण्याबाबत

**(२) * २५३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत प्रकल्पातून वर्षाला सरासरी १४०० मेगावॅट वीजनिर्मिती केली जात असून सदरहू केंद्रातून मोठ्या प्रमाणात तयार होणाऱ्या ओल्या व कोरड्या राखेच्या विक्री संदर्भात शासनस्तरावर अद्यापही धोरण निश्चित करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यातून निघणाऱ्या एक ट्रक म्हणजेच ६ ब्रास कोरड्या राखेची किंमत ८ ते १० हजार रुपये एवढी असून त्याची वार्षिक उलाढाल १००० कोटी रुपये इतकी असून यामध्ये राखेच्या विक्रीमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर गैरव्यवहार कंत्राटदार व संबंधित अधिकाऱ्यांच्या संगनमताने होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन राखेच्या विक्रीचे धोरण निश्चित करणेसह यातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्य शासनाने शासन निर्णय दिनांक १३.१२.२०१६ अन्वये राख वापरासंबंधीचे धोरण निश्चित केले आहे.

केंद्र शासनाच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालय (MoEF & CC) च्या २०२१ च्या नवीन अधिसूचनेनुसार तसेच त्यानंतरच्या २०२२ आणि २०२४ मार्गदर्शक सूचना विचारात घेवून राख वापरा संबंधित सुधारित धोरण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२) राज्य शासनाचे प्रचलित धोरण, MoEF & CC च्या नवीन अधिसूचना दिनांक ३१.१२.२०२१ व Mop च्या सन २०२४ च्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे परळी औष्णिक विद्युत केंद्रातील कोरडया राखेची निविदेद्वारे विक्री होते.

महानिर्मिती कंपनीद्वारे, परळी औष्णिक विद्युत केंद्रात सन २०२३-२४ या वर्षात सरासरी ६.७३ लाख मेट्रिक टन कोरड्या राखेची विक्री झाली असून, त्यातून महानिर्मिती कंपनीस रु.२१.२५ कोटी महसूल प्राप्त झाला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धानोरी लोहगाव (जि.पुणे) परिसरात कोयता गँगने दुकाने व रस्त्यावरील वाहनांच्या काचा फोडून दहशत निर्माण केल्याबाबत

**(३) * २१५७ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धानोरी लोहगाव (जि.पुणे) परिसरात दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी रात्रौ १२ वाजता साठे वस्ती ते कलवड वस्तीपर्यंत अंमली पदार्थ सेवन करणाऱ्या कोयता गँगने दुकाने, औषधाची दुकाने व रस्त्यावरील वाहनांच्या काचा फोडून दहशत निर्माण केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच तेथील तरुण मुलांनी अंमली पदार्थाची नशा करून याच परिसरातील महिलांची छेड काढल्याबाबतच्या तक्रारी नागरिकांनी सातत्याने शासनाकडे केल्या आहेत, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतर्गत कोयत्याचा वापर करून संघटीत गुन्हेगारी करणारी संघटना/टोळी अस्तित्वात नाही. मात्र, कोयत्याचा वापर करून गुन्हा करणारे गुन्हेगार पोलीस तपासामध्ये निष्पन्न झाले आहेत.

कलवड वस्ती येथील केदारेश्वर मेडीकलवर हल्ला करुन काऊंटरची व फ्रिजची काच तोडून दुकानाचे नुकसान केले आहे. तथापि, परिसरातील महिलांची छेड काढल्याबाबतची तक्रार पोलीस तपासात आढळून आली नाही. तसेच सदर गुन्ह्यातील आरोपींनी अंमली पदार्थाचे सेवन केले नसल्याचे प्राथमिक वैद्यकीय तपासातून निष्पन्न झाले आहे.
(३) सदर प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरुन विमानतळ पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे दि.२०.१२.२०२४ रोजी आरोपींविरुध्द कलम १०९, ११५ (२), ३५२, ३२४ (५), १२५ (अ), ३ (५) भारतीय न्याय संहिता-२०२३ सह भारतीय शस्त्र अधिनियम कलम ४, २५ अन्वये गु.र.नं.६६४/२०२४ दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासामध्ये एकूण ३ आरोपी निष्पन्न झाले असून त्यापैकी एक आरोपी हा विधी संघर्षीत बालक असून त्याला दि.२०.१२.२०२४ रोजी मा.बाल न्यायमंडळ, येरवडा, पुणे शहर यांच्या समक्ष हजर करण्यात आले आहे. एका आरोपीला दि.२०.१२.२०२४ रोजी अटक करण्यात आली असून त्याला न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्यात अद्यापपर्यंत फरार असलेल्या मुख्य आरोपीस दिनांक १७.०३.२०२५ रोजी हैद्राबाद येथून ताब्यात घेण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वसई-विरार (जि. पालघर) महानगरपालिका क्षेत्रातील वीजतारा भूमिगत करण्याबाबत**

**(४) * २५५९ श्री.राजन नाईक (नालासोपारा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिका क्षेत्रात महावितरणाच्या माध्यमातून ओव्हरहेड केबलद्वारे वीजपुरवठा होत असून पावसाळ्यात वादळी वाऱ्यामुळे झाडे ओव्हरहेड केबलवर पडत असून वारंवार वीज खंडित होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे परिसरातील वीजपुरवठा अमर्याद कालावधीसाठी खंडित होत असल्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णालये, शाळा व नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महावितरणाच्या वसई महामंडळाकडून भूमिगत विद्युत वाहीन्या टाकण्यासाठी शासनाकडे सादर करण्यात आलेला रु. २११ कोटींचा प्रस्ताव अद्यापही मंजूरीसाठी प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन उक्त प्रस्तावास मंजूरी देऊन भूमिगत विद्युत वाहिन्यांचे काम सत्वर पुर्ण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.

पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात वसई मंडळ कार्यलयातर्गंत बहुतांश २२ के.व्ही. उच्चदाब व लघुदाब वाहिन्या हया उपरी तार वाहिन्या स्वरुपाच्या असून काही भागातील वाहिन्या या जंगली भागातील झाडा-झुडपातून जातात. त्यामुळे झाडाच्या फांदया वाहिनीवर तुटून पडून विद्युत वाहन तारा तुटतात. त्यामुळे सदर भागात विद्युत पुरवठा खंडित होतो.

(३) व (४) महावितरणमार्फत, कोकण आपत्ती सौम्यीकरणांतर्गंत वसई-विरार समुद्र किनारपट्टी भागातील व जंगलातून जाणाऱ्या उपरी तार वाहिन्या भूमिगत करण्यासाठी रु.२११.५५ कोटींचा प्रकल्प अहवाल दि.३०.०८.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आला होता.

आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनवर्सन विभागाकडून शासन निर्णय दि.०४.०३.२०२५ नुसार वसई मंडळांतर्गत भूमीगत विद्युत वाहिन्यांचे कामे पुर्ण करण्यासाठी कोकण आपत्ती सौम्यीकरणांतर्गंत रु.२११.५५ कोटींच्या प्रकल्प अहवाल प्रस्तावास मंजूरी देण्यात आली आहे.

सदर प्रकल्प अहवालाअंतर्गत वसई-विरार समुद्र किनारपट्टी भागातील व जंगलातून जाणाऱ्या उपरी तार वाहिन्या भूमिगत करणेसाठी, २२ के.व्ही. भूमिगत उच्चदाब वाहिनी-१६४ कि.मी. तसेच लघुदाब भूमिगत वाहिनी-२३५ कि.मी.ची कामे प्रस्तावित आहेत. सदर प्रस्तावित कामे पुर्ण झाल्यानंतर उपरीतार वाहिन्यांच्या बिघाडामुळे वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण कमी होऊन ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा देणे शक्य होईल.

याशिवाय, ज्या उपरीतार वाहिन्या भूमिगतकरण करणे अत्यंत आवश्यक आहेत अशी कामे वितरण हानी कमी करणे (RDSS) या योजनेत अंतर्भूत केली आहेत. सदर योजनेतर्गंत अंतर्भूत असलेल्या २७ कि.मी २२ के.व्ही.भूमिगत वाहिनींच्या कामापैंकी ९.५७ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहेत. तसेच उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या शाखेत झालेला गैरव्यवहार

**(५) * २४५२ श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह क्रेडिट सोसायटीच्या राज्यभरातील २१ शाखांमधील ११ हजार २११ खातेदारांच्या एकूण ६३६ कोटी २७ लाख इतक्या रकमेच्या ठेवी तसेच अधिक व्याज व परताव्याचे आमिष दाखूवन ठेवण्यात आलेल्या एफ.डी. व सोने तारण प्रकरणांमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापारी, शेतकरी, शेतमजूर यांच्यासह सर्वसामान्य लोकांनी लग्नासाठी किंवा इतर महत्त्वपूर्ण बाबींसाठी रोख रक्कम किंवा सोने सदरील पतसंस्थेत ठेवले असून पतसंस्थेचे अध्यक्ष, संचालक मंडळ व कर्मचारी खातेदारांचे पैसे किंवा सोने परत करण्यास टाळाटाळ करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी ठेवीदारांचे पैसे परत न केल्यामुळे बीड पोलीसांनी उक्त संस्थेविरुद्ध ६५ गुन्हे नोंदवून अध्यक्षांसह इतरांना अटक केली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे का व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन सर्व खातेदारांना त्यांचे सोने व रोख रक्कम मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अंशतः खरे आहे.

बीड जिल्हयातील ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सो. लिमीटेड या बँकेच्या राज्यभरातील ५० शाखांमधील फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांची संख्या २०,८०२ असून त्यांची रु.११२१.४७ कोटी इतक्या रकमेची फसवणूक झाली आहे. सदर बँकेने ठेवीदारांना १२ ते १३ टक्के परताव्याचे आमिष दाखविले होते.

(२) होय. हे खरे आहे.

ज्ञानराधा मल्टीस्टेट को. ऑप क्रेडीट सोसायटी लिमीटेड या बँकेच्या चेअरमन व संचालक यांच्याकडून ठेवीदाराना ठेवी परत करण्यासाठी वारंवार तारखा देण्यात आल्या. परंतु ठरलेल्या तारखेला ठेवीदारांना ठेवी परत करण्यास टाळाटाळ केली.

(३) होय. अंशतः खरे आहे.

ठेवीदारांचे पैसे परत न केल्यामुळे ज्ञानराधा मल्टीस्टेट विरूद्ध बीड जिल्ह्यात ७६ गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हयामध्ये अदयाप पर्यंत अध्यक्षांसह एकुण १० आरोपीना अटक करण्यात आलेली आहे.

(४) सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, बीड यांच्याकडून अध्यक्ष व संचालक मंडळाची ०४ वाहने किंमत रु.४०,५०,०००/- व मुख्य शाखेतील ०३ सीपीयू जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या नावे असलेल्या बँक खात्यातील रु.३५,२२,८८०/ रूपये व तिरूमला ईडीबल ऑईल (द कुटे ग्रुप) अंतर्गत ५,७६,३७३/- रूपये रक्कम गोठविण्यात आलेली आहे. ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या सारडा संकुल शाखेतुन सोन्याचे दागिने रु.३,०३,१००/- व मुख्य कार्यालय लॉकर मधुन रोख रक्कम ६,३४,३९०/-रूपये जप्त करण्यात आली आहे. तसेच बँकेचे संचालक यांचे नावे असलेली एमआयडीसी चिंचोली सोलापुर येथील तिरूपती अॅग्रो सरकी पेंडीचे मोठे गोदाम किंमत अंदाजे रु.८५.०० कोटी व इतर मशीनरी जप्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीत होत असलेले प्रदूषण रोखण्याबाबत

**(६) * ४६७९ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीपात्रातील पाणी प्रदुषित झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रभागा नदीत स्नान करण्यास येणाऱ्या भाविकांना दुषित पाण्यात स्नान करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नदीचे पाणी अस्वच्छ झाल्यामुळे जीबीएससारखा धोकादायक आजार पसरण्याची भीती भाविकांमध्ये निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने चंद्रभागा नदीचे प्रदूषण रोखण्याकरीता व नदीतील पाण्याचे शुद्धीकरण करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे.

प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने चंद्रभागा नदीपात्रातील पाणी प्रदुषित झाल्याबाबतची कोणतीही तक्रार महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त झालेली नाही. तथापि, चंद्रभागा नदी पात्रात पाणी साठलेले असल्यामुळे पाण्यामध्ये घाण साठून पाणी खराब झाल्याबाबतची तक्रार सहाय्यक अभियंता, जलसंपदा विभाग यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाली होती.

(३) हे खरे नाही .

जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार चंद्रभागा नदीच्या पाण्यामध्ये स्नान केल्यामुळे जीबीएस आजार होण्याची शक्यता नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

(४) • महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत अप्रक्रियाकृत सांडपाणी नदीपात्रामध्ये मिसळू नये यासाठी उपाययोजना करणेबाबत पंढरपूर नगरपरिषदेस दिनांक ५ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

- चंद्रभागा नदीचे प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने मा.मुखमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नमामि चंद्रभागा प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुषंगाने विभागीय आयुक्त, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येतात.
- नमामि चंद्रभागा अभियानांतर्गत चंद्रभागा नदी निर्मळ व प्रदूषणमुक्त करण्याच्या अनुषंगाने रु.४८.२५ कोटी किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या असून राज्य शासनामार्फत ३४.६५ कोटी इतका निधी वितरीत केला आहे. सदर योजनेतंर्गत सांडपाणी व्यवस्थापन व अनुषंगिक कामे प्रगतीच्या विविध टप्प्यावर आहेत.
- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत नदी प्रदूषणाविषयी प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने वेळोवेळी पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या संबंधितांवर नियमानुसार कारवाई करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील वडनेर शिवारात छापा टाकून गांजाची शेती उदध्वस्त केल्याबाबत

**(७) * ७१३ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालिक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यातील वडनेर शिवारात शेत गट क्रमांक ५७० मध्ये छापा टाकून पोलिसांनी गांजाची शेती उदध्वस्त केली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू छाप्यामध्ये २ लाख २० हजार २०० इतक्या रकमेच्या गांजाची झाडे जप्त करुन संबंधिताना अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून अशा प्रकारांवर आळा घालणेसह दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) मालेगाव तालुक्यातील वडनेर शिवारात चोरून लपून गांजाची लागवड केली असल्याचे निदर्शनास आल्याने पोलीस विभागाने वडनेर खाकुर्डी पोलीस ठाणे येथे गु.र.नं.२९/२०२५,एन.डी.पी.एस. का.क.८, २० (ब) ii (क) प्रमाणे दि.१३/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यात गांजाची लागवड करणा-या आरोपीस दिनांक १६/०१/२०२५ रोजी अटक करण्यात आलेली आहे तसेच एकुण २,२०,२००/- रुपये एवढ्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सद्यस्थितीत आरोपी मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे न्यायालयीन कोठडीमध्ये असुन सदर गुन्ह्यातील पुढील तपास सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात टप्पे वाहतुकीचे दर निश्चित करुन खाजगी बस चालक-मालकांकडून सामान्य प्रवाशांची होणारी आर्थिक लूट रोखण्याबाबत

**(८) * ३८३४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईहून कोकण गोव्याला तसेच पश्चिम महाराष्ट्रात जाणाऱ्या सर्वसामान्य प्रवाश्यांकडून सणासुदीच्या कालावधीत खाजगी बस मालक-चालक मुंबई पासून गोवा, वैभववाडी, गुहागर, चिपळूण, सावंतवाडी, लोणावळा, महाबळेश्वर पर्यंत प्रचलित दरापेक्षा जादा म्हणजेच ९०० ते ५००० रुपयेपर्यंत जादा दर आकारुन प्रवाशांची आर्थिक फसवणूक करीत असल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू खाजगी बस चालकांकडून होत असलेली अवाजवी दरवाढ रोखण्यासाठी टप्पे वाहतूकीचे दर निश्चित करण्यासाठी शासनामार्फत मागदर्शक नियमावली तयार करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवाजवी दरवाढ रोखणेसह दोषी खाजगी बस चालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर ०४१२/ प्र.क्र. ३७८ (पु.बां. ०७) परि - २, दिनांक २७.०४.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील खाजगी कंत्राटी प्रवासी वाहनांचे कमाल भाडे दर निश्चित करण्यात आले आहेत. सदर दर हे त्याच स्वरुपाच्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संपूर्ण बससाठी येणाऱ्या प्रति कि.मी. भाडेदराच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक राहणार नाही असे कमाल भाडेदर निश्चित करण्यात आले आहेत. शासनाने निर्धारित केलेल्या विहित भाडे दरापेक्षा जादा भाडे दर आकारत असल्याचे आढळून आल्यास, अशा वाहतूकदारांविरुध्द कारवाई करण्यात येते. ठरवून दिलेल्या भाडे दरापेक्षा अधिक दर आकारणाऱ्या खाजगी बस वाहतूकदारांविरुध्द कारवाई करण्याबाबत वायुवेग पथकांना आदेशित करण्यात आले आहे.

(३) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य, पूर्व, पश्चिम) बोरीवली कार्यालयाच्या वायुवेग पथकांमार्फत विहीत भाडे दरापेक्षा जादा भाडे आकारणाऱ्या वाहनांची नियमितपणे तपासणी करुन कारवाई करण्यात येते. मुंबईतील ४ प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयातील वायुवेग पथकांमार्फत माहे एप्रिल, २०२४ ते जानेवारी, २०२५ या कालावधीमध्ये ५२७ खाजगी बसेसवर कारवाई करण्यात आली असून त्याअंतर्गत रुपये ५८.३२ लक्ष एवढे तडजोड शुल्क वसुल करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुमसर (जि.भंडारा) येथील ॲक्सिस बँकेच्या व्यवस्थापकाने कर्मचाऱ्यांच्या संगनमताने केलेला गैरव्यवहार

**(९) * ४२६९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर (जि.भंडारा) येथील ॲक्सिस बॅकेच्या व्यवस्थापकाने कर्मचाऱ्यांच्या संगनमताने बॅकेतून अनधिकृतरित्या ५ कोटी रुपये रक्कम काढून गाडी क्रमांक सीजी-०४-एमझेड-२००६ या वाहनातून इंदिरानगर येथे असलेल्या राजकमल ड्रायक्लिनर्स आर्ट या दुकानात ठेवल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दुकानात तुमसर पोलीसांनी धाड टाकून सदर रक्कम जप्त केल्याचे दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामाच्या मोबदल्यात ॲक्सिस बँकेच्या व्यवस्थापकास सहा कोटी रूपये मिळणार होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हो, हे खरे आहे.

दि.४ फेब्रुवारी, २०२५ रोजी इंदिरानगर, तुमसर, जि.भंडारा येथील राजकमल ड्रायक्लिनर्स लाँड्री दुकानात मोठया प्रमाणात रोख रक्कम ठेवली असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाल्यानंतर पोलीस पथकाने छापा टाकला असता सदर लाँड्री दुकानात रु.५ कोटी इतकी बेहिशोबी रक्कम मिळून आली असून सदर रक्कम जप्त करण्यात आली आहे.
(३) रु.५ कोटीच्या बदल्यात ७ कोटी रुपये इतकी रक्कम देण्याचे आमिष बँकेच्या व्यवस्थापकास दाखविण्यात आल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे.
(४) सदर प्रकरणी दि.०५.०२.२०२५ रोजी प्राप्त लेखी फिर्यादीवरुन तुमसर पोलीस ठाणे, जि.भंडारा येथे भारतीय न्याय संहिता कलम ३१६(१), ३१६(५), ३१८(४) व ६१(२) अन्वये एकूण ११ आरोपींविरुध्द गु.र.नं.६१/२०२५ दाखल करुन त्यांना दि.०५.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. तदनंतर अधिक तपासामध्ये एका आरोपीला दि.०८.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून सद्यस्थितीत १२ आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. पोलीसांकडून सदर गुन्ह्याचा अधिक तपास सुरु असून गुन्ह्यात निष्पन्न झालेले इतर २ आरोपी घटनेच्या तारखेपासून फरार असल्याने त्या आरोपींचा शोध घेणे चालु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धाराशिव नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांनी केलेला गैरव्यवहार

**(१०) * २२४५ श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपरिषदेचे श्री.हरी कल्याण यलगट्टे, निलंबित मुख्याधिकारी यांच्यावर गैरव्यवहार व विविध प्रकरणी गुन्हे दाखल असून त्यांच्या सर्व बँक खात्याची, स्थावर व जंगम मालमतेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (A.C.B.) चौकशी करण्यासाठी धाराशिवचे जिल्हाधिकारी यांना दिनांक १० जुलै, २०२३, पोलिस उपअधिक्षक यांना दिनांक १५ एपिल, २०२३ व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिनांक २४ जुलै, २०२३ रोजी पत्र देवूनही अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निलंबित मुख्याधिकारी यांनी अवैध मार्गानी जमवलेल्या संपत्तीची तक्रार प्राप्त होवूनही लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत या प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी, निलंबित मुख्याधिकारी यांच्या बँक खात्याची, स्थावर व जंगम मालमतेची ACB मार्फत चौकशी करण्याबाबतचे दिनांक १० जुलै, २०२३ रोजीचे पत्र धाराशिवचे जिल्हाधिकारी यांना प्राप्त झाले आहे. तसेच निलंबित मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध दिनांक ०५.०४.२०२३ रोजीचा तक्रार अर्ज तसेच दिनांक २४.०७.२०२३ रोजीचे पत्र पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धाराशिव यांच्या कार्यालयास प्राप्त झाले असून त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून कार्यवाही करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्रचलित कार्यपद्धतीनुसार व भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) अन्वये धाराशिव नगरपरिषदेचे निलंबित मुख्याधिकारी यांच्याविरुद्ध गैरव्यवहार व विविध प्रकरणी दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने त्यांच्या स्थावर व जंगम मालमत्तेची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत उघड चौकशी (Open Enquiry) करण्यास परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव नगरविकास विभागास प्राप्त झाला असून तो शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा प्रकल्पातून बोटीद्वारे रेतीचा अवैध उपसा करण्यात येत असल्याबाबत

**(११) * १६७३ श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देऊळगाव राजा (जि.बुलढाणा) तालुक्यातील खडकपूर्णा प्रकल्पातून परराज्यातील मजूरांकडून सुमारे ५० ते ६० बोटींद्वारे रेतीचा अवैध उपसा करण्यात येत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर गुन्हे दाखल करणेसह व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) महसूल व पोलिस विभागाने केलेल्या धडक कारवाईत जलसंपदा विभागाच्या अखत्यारीत असलेल्या खडकपूर्णा प्रकल्पामध्ये अवैध रित्या धरणाच्या जलाशयातून अवैध वाळू उपसा करणाऱ्या २६ बोटी नष्ट करण्यात आल्या आहेत. यावेळी सापडलेल्या ३ मजुरांकडे राज्याबाहेरील आधारकार्ड असल्याचे दिसून आले आहे.

संबंधित राज्याबाहेरील मजुरांवर देऊळगांव राजा पोलीस स्टेशन येथे दिनांक २२.०१.२०२५ रोजी, गु.र.क्र.००२३/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३०३ (२) व ३ (५) तसेच खाण आणि खनिज अधिनियम, १९५७ च्या कलम २१(१) व २१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात येवून सदर आरोपीना अटक करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरेड (जि.नागपूर) येथे ई-सिगारेटची राजरोसपणे विक्री होत असल्याबाबत

**(१२) * ५१६४ श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरेड (जि.नागपूर) येथे काही महिन्यापासून केंद्र शासनाची बंदी असलेल्या ई- सिगारेट, क्रिकेट सट्टा, गांजा आणि जुगाराचा व्यवसाय सुरु असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमरेड शहरातील शाळेलगतच्या "आनंद बॅग हाऊस ॲण्ड स्टेशनरी" या दुकानामध्ये ई-सिगारेट, गांजा, फ्लेवर्ड सिगारेट, हॉर्स पावडर, गर्भपाताच्या गोळया इ. बाबींची देखील खुलेआम विक्री होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हुबेहुब पेनसारख्या दिसणाऱ्या या सिगारेट असून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नशेच्या आहारी जात असून दिवसेंदिवस या दुकानात विद्यार्थ्यांची वर्दळ वाढत असल्याच्या तक्रारी पालकांनी पोलीस स्टेशनमध्ये केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी करुन अशा प्रकारांना आळा घालण्यासह संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

पोलीस स्टेशन, उमरेड (जि. नागपूर) येथे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये जुगारासंबंधी ८ गुन्हे व गांजासंबंधी २ गुन्हे व ई-सिगारेटची विक्री केल्याने २ गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. तथापि, क्रिकेट सट्टा बाबत गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली नाही.

(२) आनंद बॅग हाऊस ॲण्ड स्टेशनरी या दुकानावरील तपासणीदरम्यान ई-सिगारेट मिळून आले. तथापि, गांजा, फ्लेवर्ड सिगारेट, हॉर्स पावडर, गर्भपाताच्या गोळया इ. बाबींची विक्री होत असल्याचे आढळून आले नाही.

(३) पालकांकडून पोलीस स्टेशनमध्ये तक्रारी प्राप्त नाहीत. तथापि, एका सामाजिक कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशन, उमरेड (जि. नागपूर) येथे दिनांक ०५.०२.२०२५ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उमरेड शहरातील शैक्षणीक संस्थांच्या आजूबाजूला असलेल्या पानदुकानांची नियमित तपासणी करण्यात येत आहे.

(४) पोलीस स्टेशन, उमरेड (जि. नागपूर) येथे ई-सिगारेटची विक्री केल्याने एका आरोपीविरूद्ध गु.र.क्र.५६/२५ अंतर्गत इलेक्ट्रानिक सिगारेट (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक व जाहिरात) प्रतिबंध अधिनियम, २०१९ च्या कलम ४, ७ नुसार आणि गु.र.क्र.५८/२५ अंतर्गत सिगारेट आणि तंबाखू उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार वाणिज्य व्यवहार आणि उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) अधिनियम, २००३ चे कलम ६, २४ व बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ७७ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर आरोपीस दिनांक ०४.०२.२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.

उक्त नमूद दोन्ही गुन्ह्यांचा तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्ह्यातील उच्च दाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत निविदा न काढताच कंत्राटदाराला कामे वाटप केल्याबाबत

**(१३)** * **३५६८ श्री.राजेश विटेकर (पाथरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील उच्च दाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत २ कोटी ५० लाख इतक्या रकमेच्या निविदा न काढता सात कंत्राटदारांना नियमबाह्य पद्धतीने कामे दिल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त कामांपैकी बहुतांशी कामे प्रत्यक्षात न होता केवळ कागदोपत्री दाखविल्याबाबतच्या तक्रारी संभाजीनगर येथील सह व्यवस्थापकीय संचालकाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी सह व्यवस्थापकीय संचालकांनी तत्कालीन अधीक्षक अभियंत्यासह संबंधित कंत्राटदारांना नोटीसा बजाविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांच्याविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही,

परभणी जिल्ह्यात कृषीपंप ग्राहकांना उच्चदाब वितरण प्रणालीवर वीज जोडणी देण्याकरीता कृषीपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत एकूण रु.१४.३४ कोटी इतका निधी मंजूर झाला होता. सदरची कामे महावितरणमार्फत सुचीबध्द कंत्राटदारांमार्फत करण्यात आली आहेत. सदर सुचिबद्ध कंत्राटदारांची निवड निविदा काढून करण्यात येते. परभणी मंडळाअंतर्गत विभाग क्र.१ व विभाग क्र.२ अंतर्गत प्रत्येकी ०३ सूचीबध्द कंत्राटदारांना उच्चदाब वितरण प्रणालीवर कृषीपंपांना वीज जोडणीची कामे करण्याकरीता एकूण रु.६.०० कोटी इतक्या निधीचे कार्यादेश देण्यात आले होते. तसेच, ०६ सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना प्रत्येकी रु.१० लाख याप्रमाणे कृषीपंप वीज जोडणी कामाचे कार्यादेश देण्यात आले होते. उर्वरित रु.७.७४ कोटी इतक्या निधीमध्ये ०२ निविदा काढण्यात येऊन त्याद्वारे सक्सेसफुल बिडर यांना कामे देण्यात आली आहेत. उपरोक्त कामांच्या निविदा व कार्यादेशानुसार परभणी विभाग क्र.१ व विभाग क्र.२ अंतर्गत एकूण ४०० कृषीपंप ग्राहकांना विद्युत जोडणी देण्यात आली आहे.
(२) परभणी जिल्ह्यातील उच्चदाब वितरण प्रणाली योजनेतंर्गत झालेल्या कामांबाबत सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे तक्रार प्राप्त झाली आहे.
(३) व (४) सदर प्रकरणी सह व्यवस्थापकीय संचालक, महावितरण, छत्रपती संभाजीनगर यांनी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना नोटीसा बजाविल्या असून, विभागीय चौकशीची कार्यवाही चालू आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कोळसा खाणी व इतर मोठ्या उद्योगांमुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याबाबत

**(१४)** * **५३९३ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यातील नीलजई, नायगाव-बेलोरा खाणीत कोळसा उत्खननासाठी दररोज तीव्र स्वरुपाचे स्फोट केले जात असल्याने परिसरातील घरांना प्रचंड हादरे बसत असून भिंतीला तडे गेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच गेल्या काही वर्षात कोळसा खाणी व इतर मोठ्या उद्योगांमुळे प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून घरांचे, शेती पिकांचे नुकसान व नागरिकांच्या आरोग्यविषयक समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कोळसा खाणींमुळे परिसरातील घरांची व शेतीची मोठ्या प्रमाणात हानी होत असून प्रदूषणात देखील वाढ झाल्यामुळे यासंदर्भात उपाययोजना करण्याची मागणी स्थानिकांकडून संबंधित खनिकर्म विभागातील अधिकाऱ्यांकडे तसेच प्रदूषण नियंत्रण महामंडळाकडे करण्यात आली असूनही संबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन घरे व शेती पिकांचे नुकसान टाळणे, प्रदूषण रोखणेबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) मे.वेस्टर्न कोल फिल्ड लि. या भारत सरकारच्या कंपनीच्या नीलजई आणि नायगाव-बेलोरा येथील कोळसा खाणीमध्ये सुरक्षा निर्देशक, खाण सुरक्षा निर्देशालय, नागपूर यांच्या देखरेखीखाली नियंत्रीत स्फोट पध्दत (Control Blasting) या शास्त्रशुध्द पध्दतीने खनिजाचे उत्खनन होत आहे. तसेच कोळसा खाणीपासून ५०० मीटरच्या आत एकही गाव अथवा रहिवासी घरे नसल्याने, परिसरातील घरांना प्रचंड हादरे बसत असून भिंतीला तडे गेले आहेत, अशी वस्तुस्थिती नसल्याचे, महानिदेशक, खाण सुरक्षा महानिदेशालय यांनी कळविले आहे.

(२) कोळसा खाणी व इतर मोठ्या उद्योगांमुळे नागरिकांच्या आरोग्यविषयक किरकोळ स्वरुपाच्या तक्रारी वगळता गंभीर आजार नसलेले रुग्ण आढळून आले नसल्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी दि.०३/०३/२०२५ अन्वये कळविले आहे.

तसेच जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, यवतमाळ यांच्या दि.०३/०३/२०२५ च्या अहवालानुसार, सदर क्षेत्रातील माती व कापूस पिकांचे नमुने घेऊन पृथ:करणासाठी राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संस्था, नागपूर आणि कापसाच्या गुणवत्तेसाठीचे नमुने केंद्रीय कापूस प्राद्योगिक अनुसंधान संस्थान, नागपूर यांचेकडे दि.१८/०२/२०२५ रोजी पाठविण्यात आलेले आहेत. याबाबतचा अहवाल प्राप्त होताच आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे पर्यावरण विभागाच्या अहवालात नमूद केले आहे.

(३) लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांकडून प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने, संबंधित स्थानिक यंत्रणाकडून वेळोवेळी कार्यवाही केली जाते आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## टाकेद बुद्रुक (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे शाळेतील मुख्याध्यापकाने अल्पवयीन आदिवासी मुलीवर केलेला अत्याचार

**(१५) * ५२७९ श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टाकेद बुद्रुक (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथे शाळेतील मुख्याध्यापकाने सहावीच्या वर्गात शिकत असलेल्या १३ वर्षीय अल्पवयीन आदिवासी विद्यार्थीनीला घरी बोलावून बलात्कार केल्याची घटना माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे,

(२) व (३) सदर प्रकरणी घोटी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.५८/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६५(१), ७५ सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४, ६, ८, १२ अन्वये दि.०८.०२.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात दोन आरोपी अटक असून न्यायालयीन कोठडीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## स्वारगेट (जि.पुणे) येथे घरोघरी खाद्यपदार्थ पोहचविणाऱ्या मुलाने सुमारे ८० लाख रुपयांची चोरी केल्याबाबत

**(१६) * ८४९ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) स्वारगेट (जि.पुणे) येथे घरोघरी खाद्यपदार्थ पोहचविणाऱ्या (डिलिव्हरी बॉय) मुलाने सोसायटीतील बंद सदनिकाची पाहणी करुन सुमारे ८० लाख रुपयांची चोरी केली असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी आरोपीला अटक केली असता त्याने अजून १४ ठिकाणी चोरी केली असल्याचे मान्य करुन, त्यांच्याकडे व त्याच्या साथीदारांकडे ८६० ग्रॅम सोन्याचे दागिने, साडेतीन किलो चांदी, १५० हिरे, दुचाकी व दोन पिस्तुलांसह पाच काडतुसे असा मुद्दे माल हस्तगत करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर चोरी केलेला मुद्देमाल सराफा व्यावसायिकामार्फत विक्री केला जात असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. दि.१८ जानेवारी, २०२५ रोजी सॅलसबरी पार्क, पुणे येथे घराचा दरवाजा बनावट चावीच्या सहाय्याने उघडून घरातील २९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, २० तोळयाची सोन्याची लगड व ४.५ किलो वजनाची चांदीची लगड चोरी झाल्याच्या फिर्यादीच्या तक्रारीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परंतु एका सदनिकेतून ८० लाख रुपयांची चोरी झाली नसून अटक करण्यात आलेल्या आरोपीकडून एकूण १४ घरफोडीचे गुन्हे व स्वारगेट एसटी स्टँड मधील ७ चोऱ्या उघडकीस आणून त्या सर्वांमधील हस्तगत करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ८० लाख रुपये आहे. अटक आरोपीतांकडून एकूण ८६० ग्रॅम सोने, ३.५ किलो चांदी, १५० हिरे, २ पसि्तूल, ५ जिवंत काडतुसे, १ दुचाकी गाडी, घरफोडी करण्याचे साहित्य, लाल रंगाची झोमॅटो कंपनीची डिलेव्हरी बॅग इ. मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

(३) हो खरे आहे.

मुख्य आरोपी हा दलालामार्फत सराफा व्यावसायिकाकडे चोरीच्या दागिन्यांचा व्यवहार करित असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

(४) सदर प्रकरणी दि.१९ डिसेंबर, २०२४ रोजी स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ५२६/२०२४, भारतीय न्याय संहिता कलम ३०५, ३३१ (३), ३१७ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याच्या तपासात निष्पन्न मुख्य आरोपी, चोरीच्या दागिन्यांचे व्यवहार करणारा मध्यस्थ आणि संबंधित सराफा व्यावसायिक यांना दि.०२ जानेवारी, २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. सद्यस्थितीत दोन आरोपी न्यायालयीन कोठडीत असून एका आरोपीस दि.२६.०२.२०२५ रोजी जामीन मिळालेला आहे. सदर प्रकरणी मा.जिल्हा व सत्र न्यायालय, पुणे येथे दि.०२.०३.२०२५ रोजी दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्याकरिता पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यक्षेत्रामध्ये खालील उपाययोजना करण्यात आल्या आहेत :-

१. बिट मार्शल यांच्याकडून पो.स्टे.च्या हद्दीमध्ये सतर्कपणे पेट्रोलिंग करण्यात येत आहे.

२. चोरीच्या घटना रोखण्यासाठी सोसायट्यामध्ये योग्य त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

३. ऑनलाईन डिलिव्हरी करणाऱ्या व्यावसायिकांना त्यांच्याकडील डिलिव्हरी बॉयज् ची माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देऊन त्यांचे चारित्र्य पडताळणी करुनच त्यांना नोकरी देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

४. सराफ व्यावसायिकांसोबत बैठक घेऊन अनोळखी व्यक्तीकडून सोने खरेदी न करण्याच्या आणि विनापावतीचे सोने खरेदी करु नये अशा प्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वीज वितरण कंपनी ग्राहकांकडून वीज वहन आकार व अनामत रक्कम वसूल करीत असल्याबाबत

**(१७) * ९६८ श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीज वितरण कंपन्या ग्राहकांकडून दरवर्षी वीज देयकातून वीज वहन आकार व अनामत रक्कम नियमबाह्य पध्दतीने वसूल करुन मोठ्या प्रमाणात ग्राहकांची आर्थिक पिळवणूक करीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्राहकांकडून वारंवार विरोध, तक्रारी करुनही याची कोणतीही दखल या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांकडून घेण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधित एजन्सी व अधिकारी यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासह ग्राहकांची होणारी लूट थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगास राज्यातील वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. संपूर्ण नियामक प्रक्रियेचा अवलंब करुन मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोगतर्फे वीज दराबाबत निर्णय घेण्यात येतो. त्यानुसारच, वीज वितरण कंपनीकडून वहन आकारासह वीज दराची आकारणी करण्यात येते.

मा.महाराष्ट्र वीज नियामक आयोग, वीज दर आदेश क्र.२२६/२०२२, दि.३१.०३.२०२३ नुसार राज्यातील विविध वर्गवारीतील ग्राहकांना व्होल्टेज क्षमतेवर आधारित वहन आकार निश्चित करण्यात आले असून, सदर दराची आकारणी वीज वितरण कंपन्याकडून करण्यात येत आहे. यामध्ये कोणताही बदल करण्याचा अधिकार वीज वितरण कंपन्याना नाही. याबाबत ग्राहकांकडून काही तक्रारी प्राप्त झाल्यास संबंधित वीज वितरण कंपन्यामार्फत सदर बाब ग्राहकांच्या निदर्शनास आणून देण्यात येते.

विद्युत अधिनियम २००३ मधील कलम ४७ च्या उपकलम (१) व मा. महाराष्ट्र वीज नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१ कलम ३१ नुसार "वितरण परवानाधारक वीजेचा पुरवठा मंजूर करण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तिंकडुन सुरक्षा अनामत रक्कमेची मागणी करु शकेल" अशी तरतूद करण्यात आली आहे. सदर तरतूद ही वितरण परवानाधारकातर्फे ग्राहकास करण्यात आलेल्या विद्युत पुरवठयाच्या वीज देयकाचा भरणा ग्राहकाकडून वेळेत न झाल्यास थकबाकीच्या वसुली होण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील वारसा स्थळे व गडकिल्ल्यांचे संवर्धन करण्याबाबत

**(१८) * ३६३४ श्री.शंकर जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्रातील गड किल्ल्यांना जागतिक वारसा स्थळांचा सन्मान मिळविण्याचा शासनस्तरावरुन प्रयत्न होत असताना दुसरीकडे या गडकिल्ल्यांचे पर्यटकांकडून नुकसान व विद्रुपीकरण केले जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात प्लास्टिक बंदी असताना सुध्दा या गडकिल्ल्यांवर पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या व मद्याच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची पाकिटे, कागदी तसेच थर्माकोल डिश, टिश्यु पेपर इत्यादी प्लास्टिक कचऱ्यात दिवसेंदिवस वाढत होत असून परिसरातील अस्वच्छता वाढत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ऐतिहासिक वारसा स्थळांचे संरक्षण व जतन करण्यासंदर्भात शासनाच्या विविध विभागांकडून कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) भारतातील मराठा लष्करी भूप्रदेश (Maratha Military Landscape of India) या संकल्पने अंतर्गत महाराष्ट्र व तामिळनाडू राज्यातील मराठा लष्करी स्थापत्यशास्त्राचा वारसा लाभलेल्या १२ किल्ल्यांना UNESCO जागतिक वारसा नामांकन मिळण्याकरिता राज्यशासन व भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यवाही सुरू आहे, हे खरे आहे.

काही ठिकाणी गड किल्ल्यांवर पर्यटकांकडून नुकसान आणि अस्वच्छता केलेली आढळते.
(३) यासाठी महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० यान्वये किल्ले व प्राचीन स्मारके यांच्या परिसराचे विद्रुपिकरण केल्यास शिक्षेमध्ये वाढ केली आहे.

तसेच, राज्यातील वारसा स्थळे व त्यांचे महत्त्व लक्षात घेता विविध सामाजिक संस्था/शैक्षणिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वेळोवेळी गडकिल्लयांवर स्वच्छता मोहिम आयोजित करण्यात येतात.

राज्य संरक्षित किल्ल्यांवर नियमितपणे जतन संवर्धनाची कामे विभागाकडून करण्यात येतात.

राज्य संरक्षित स्मारकांचे सुनियोजित व्यवस्थापन होण्याकरिता महावारसा समितीची स्थापना राज्य, जिल्हा आणि स्मारक स्तरावर दि.१६.०२.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये करण्यात आली आहे.

पर्यटन विभागाकडून पर्यटक सुविधा निर्माण करणे, गृह विभागाकडून महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष अधिनियम, १९६० अंमलबजावणीसाठी कार्यवाही होते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## श्रीनगर (जि.नांदेड) येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांस पोलीस कर्मचाऱ्याने मारहाण केल्याबाबत

**(१९) * ९४ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीनगर (जि.नांदेड) येथील एका वसतिगृहामध्ये राहणाऱ्या व नेटची तयारी करणाऱ्या १८ वर्षीय विद्यार्थाच्या तोंडात रुमालाचा बोळा कोंबून त्याला पोलीस कर्मचारी श्री.आकाश सावंत यांने बेदम मारहाण केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पोलीस कर्मचाऱ्यासोबत अन्य दोन युवकांनी रात्री उशिरा वसतिगृहात येऊन चोरी केल्याबाबत विचारणा करून विद्यार्थ्यांस मारहाण केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरिता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी, भाग्यनगर पोलीस ठाणे, नांदेड येथे गु.र.क्र.२४/२०२५, भा. न्या. सं. २०२३ कलम ११८(१), ३३३, १२७(२), ३५१(३), ३(५) अन्वये एकूण ३ आरोपींवर दि.१४.०१.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी पोलीस कर्मचारी श्री.आकाश सावंत, पोलीस शिपाई यांना दि.१५.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून परेड वेळी तसेच रोलकॉल वेळी पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार यांना आवश्यक सूचना देण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना योग्य तो मावेजा न देता फसवणूक केल्याबाबत

**(२०) * १२२५ श्री.बाबासाहेब देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी विद्युत वहनासाठी टॉवर उभारणीचे काम सुरु असून त्यासाठी शेतकऱ्यांकडून संमती घेऊन जमीनींचे भूसंपादन न करता तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांची फसवणूक केली जात असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी टॉवर उभारणीच्या कामांमध्ये खाजगी कंपन्या आल्या असून त्यांच्यामार्फत जमिनीची प्रतवारी न ठरवता सरसकट एकसारखी रक्कम सर्व शेतकऱ्यांना दिल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना जमिनीचा योग्य तो मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

भारतीय विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १६४, तसेच टेलिग्राम अधिनियम, १८८५ च्या कलम १० (ड) नुसार पारेषण कंपनींना पारेषण वाहिन्या व मनोऱ्याच्या उभारण्यासाठी संबंधित जमिनीचा वापर (Right of Use) करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. त्यामुळे मनोरा व पारेषण वाहिनी उभारणीसाठी जमिनीचे भू-संपादन केले जात नाही.

शासनाने दि.०२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये जमीन वापराच्या नुकसान भरपाईपोटी मनोऱ्याने व्याप्त जमीन व अतिउच्च दाब तारेखालील जमिनीसाठी मोबदला देण्याचे धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणानुसार पारेषण वाहिन्या उभारणी करणाऱ्या शासकीय व खाजगी कंपन्यांतर्फे शेतकऱ्यांना जमिनीच्या नुकसान भरपाईपोटीची मोबदला अदा करण्यात येतो.

(२) दिनांक ०२.११.२०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मनोरा व अतिउच्च दाब पारेषण वाहिनीसाठी वापरलेल्या जमिनीच्या नुकसान भरपाईपोटीचा मोबदला संबंधित क्षेत्रातील शेतकऱ्यांना शासनाच्या बाजार मुल्यदर पत्रकानुसार (Ready Reckoner) किंवा मागील तीन वर्षात झालेल्या खरेदी / विक्री व्यवहाराच्या आधारे निश्चित होणारा सरासरी दर या पैकी जो दर अधिक असेल त्या दरावर आधारीत नुकसान भरपाई रक्कम ठरविण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर येथील गुंतवणूकदारांची गुजरातमधील क्विक स्टार्ट २४ ग्रुप कंपनीच्या संचालकाने केलेली फसवणूक

**(२१) * २५७ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) छत्रपती संभाजीनगर येथील दीड हजार गुंतवणूकदारांची गुजरातमधील क्विक स्टार्ट २४ ग्रुप कंपनीच्या संचालकाने दरमहा ३ टक्के परतावा देण्याचे अमिष दाखवून सुमारे ३५ कोटी रुपयांची फसवणूक करुन पलायन केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन गुंतवणूकदारांचे पैसे परत देणेबाबत तसेच यातील दोषी कंपनी व यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय. अंशतः खरे आहे.

गुजरातमधील क्विक स्टार्ट २४ ग्रुप कंपनीच्या संचालकाने दरमहा ३ टक्के परतावा देण्याचे गुंतवणूकदारांना आमिष दाखविले होते. सदर प्रकरणी २३ गुंतवणूकदारांची रु.१,७९,३५,०००/- इतक्या रकमेची फसवणूक झाल्याचे आतापर्यंतच्या तपासात निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरण हे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले असून कंपनीच्या संचालकांनी परदेशात पलायन केल्याची तपासात माहिती प्राप्त झाली आहे.

(२) सदर प्रकरणी जिन्सी पोलीस ठाणे, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.नं.१३/२०२५ भारतीय न्याय संहिता, २०२३ कलम ३१६(२), ३१८(४), ३३८, ३३६(३), ३४०(२), ६१ (२), ३(५) सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण) अधिनियम, १९९९ चे कलम ३ व ४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

आहे. सदर प्रकरणी २ आरोपींना अटक करण्यात आली असून परदेशी पळून गेलेल्या २ आरोपींविरुद्ध एलओसी नोटीस काढण्यात आली आहे. गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्याकरिता एमपीआयडी कायद्यानुसार आरोपींची मालमत्ता जप्त करण्याच्या अनुषंगाने आरोपींच्या मालमत्तेची माहिती घेण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.